फोन नं. (02164) 272414,
8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन – 415124 जि. सातारा

जा.क्र.शाअमक/आधार-शिष्यवृत्ती/ 2026/ 2163 दिनांक :- 23 SEP 2026

## सूचना अत्यंत महत्वाची

**विषय –** इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणा-या विदयार्थ्यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेकरीता ऑफलाईन अर्ज करण्याकरीताची नोटीस संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करणेबाबत.

**संदर्भ** –१) या संस्थेची सूचना जा. क्र. शाअमक/आधार-स्वंयमशिष्यवृत्ती/२०२६/१९०६दि.१८/०८/२०२६.
२)सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण सातारा यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र. ससंइमाबकसा/ आधार योजना/मुदतवाढ/बातमी प्रसिध्दी /२०२६-२७/१७०२दि. ०२/०९/२०२६.
३)इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र २०२६/इमावबकसं/शावगृह/ बांधकामजागा/जा. क्र.५२६६ दि.१५/०९/२०२६.
४)सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण सातारा यांचे कार्यालयाचे पत्र.ससंइमाबकसा/ आधार योजना/ऑफलाईन प्रवेश /२०२६-२७/१८२० दि.२३/०९/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने १२ वी नंतर व्यवसायीक व बिगर व्यवसायीक पदवी व पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये महाविदयालयीन शिक्षण घेणारे व वसतिगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्गातील विद्यार्थी निवासी व शैक्षणीक सुविधापासून वंचित राहू नये यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने संस्थेतील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास समाजातील सर्व विदयार्थ्यांना सूचीत करणेत येते की, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार या योजनेचा लाभ घेण्याकरीता सन २०२६-२०२७ या शैक्षणीक वर्षात प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना Online प्रवेश अर्ज भरण्याकरीता https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर दि.१२/०८/२०२६ रोजीपासून (टॅब)उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याची नोटीस वरील संदर्भ क्र.१ अन्वये संस्थेकडून प्रदर्शित करणेत आलेली आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये वरील सवलतीचा लाभ घेण्यासाठी विदयार्थ्यांना दि.१५/०९/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु वसतीगृह संकेतस्थळावर अर्ज करताना येत असलेल्या तांत्रिक अडचणीमुळे व्यवसायीक व अव्यावसाईक अभ्यासक्रमातील नवीन विदयार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी विदयार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करणेकरीता दि. ३०/०९/२०२६ रोजीपर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व फॉर्म भरताना अपलोड केलेली कागदपत्रे जोडून फॉर्म कार्यालयास सादर करावयाचा आहे याची पात्र विदयार्थ्यांनी नोंद घ्यावयाची आहे.

संदर्भ क्र.०४ अन्वये ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक अडचणींचा विदयार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर प्रतिकुल परिणाम होवू नये, तसेच वरील योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी सदर योजनेकरीता ऑनलाईन प्रक्रिया सुरळीत होईपर्यत विदयार्थ्यांना ऑफलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

जे विदयार्थी वर नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज भरणार नाहीत त्यांना सदर योजनेचा लाभ न मिळाल्यास विदयार्थी स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. याकरिता विदयार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे,जेणेकरुन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा कोणताही पात्र विदयार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही.

(डॉ.एस.जे.वाघ)
**प्राचार्य,**
**शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड**

प्रत – १.सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.
२.संस्थेच्या संकेत स्थळावरती. (अपलोड करण्यासाठी)